वाचले :- १) शासन, महिला व बाल विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०११/प्र.क्रं.७ /का.०२ दि.१३/०७/२०११.
२) इकडील आदेश क्र.सशा/पसह/कावि/१९४४/२०११, दि. १३/१०/२०११
३) मा. पालकमंत्री यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं.पालकमंत्री/अन्न व ना.पु. आणि ग्रा.सं.अ.औ.प्र.व सं.कार्य /व्ही.आय.पी./१३२६ दिनांक- १७/०८/२०१५.

---

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे
सर्वसाधारण शाखा,पसह संकलन
क्र.सशा/पसह/कावि/१६१५ /२०१५
दि. २८/०९/२०१५

**विषय :- केंद्र शासनाच्या नोकरी करणा-या महिलांसाठी सुधारित वसतिगृह योजनेअंतर्गत जिल्हास्तरावरील जिल्हा महिला कल्याण समिती**

**सुधारीत आदेश**

उक्त नमुद शासन निर्णयानुसार व आदेशानुसार सदर समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीतील अशासकिय सदस्यांच्या नियुक्तीबाबत मा. पालकमंत्री पुणे जिल्हा यांचेकडून शिफारस प्राप्त झालेने सदरचे अशासकिय सदस्यांच्या नावांचा समावेश करुन खालीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करणेत येत आहे.

| अ.क्र. | समितीची रचना व नावे | पत्ता | पद |
|---|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | अध्यक्ष |
| २ | पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामिण | चव्हाणनगर, पाषाण, पुणे | सदस्य |
| ३ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे | सदस्य |
| ४ | **जिल्हा कायदेविषयक सेवा प्राधिकरणाचा एक प्रतिनिधी** | | |
| | ॲड. अमृता ज्ञानेश्वर गुरव | ओंकारप्लाझा अपार्ट, फ्लॅट नं.३, सावतामाळी मंगल कार्यालयासमोर, राजगुरुनगर, ता.खेड, जि. पुणे मो.नं.९८५०४९८४३९ | सदस्य |
| ५ | **स्वयंसंवी संस्थेचा एक प्रतिनीधी (अशा स्वयंसेवी संस्थेचा की जी स्वयंसेवी संस्था या योजनेअंतर्गत वसतिगृह चालवित नाही किंवा तसे तिने प्रस्तावित केलेले नाही)** | | |
| | सौ. वैशाली विनोद नाईक | २९४, गंज पेठ, पुणे मो.नं.९६२३३००४३७ | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | **जिल्हाधिकारी यांना योग्य वाटेल अशी जिल्हास्तरीय एखादी नामांकित व्यक्ती** | | |
| | सौ. वैष्णवी कुलभुषण कोकरे | मु.पो.पणदरे, ता.बारामती, जि. पुणे | सदस्य |
| ७ | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | चुनावाला चेंबर्स जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५. | सदस्यसचिव |

**(सौरभ राव)**
**जिल्हाधिकारी पुणे**

प्रत :-

१) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे तथा सदस्य सचिव, चुनावाला चेंबर्स, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

२/- उपरोक्त समिती वरील आदेशान्वये गठीत करण्यात आलेले असून सदर समितीची बैठक सत्वर बोलावून समितीचे कामकाज कार्यान्वित करण्यात यावे. तसेच सोबतच्या आदेशाच्या प्रति संबंधित सदस्यां बजावून त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेणेत यावी.

२) स्वीय सहाय्यक, मा. पालकमंत्री, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२.

२/- सदर समिती या आदेशान्वये गठीत केलीबाबत मा. मंत्री महोदय यांचे निदर्शनास आणून देणेस विनंती आहे.

३) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांजकडे सविनय सादर.

**जिल्हाधिकारी पुणे करीता**

(१)

**केंद्र शासनाच्या नोकरी करणा-या महिलांसाठी सुधारित वसतिगृह योजनेअंतर्गत जिल्हास्तरावर जिल्हा महिला कल्याण समिती गठीत करणेबाबत.**

जिल्हाधिकारी, पुणे
कार्यासन संकलन
GB
दि. 21 JUL 2011
प्रमुख लिपिक अव्वल कारकून
चिटणीस ३ कोषागार उपजिल्हाधिकारी

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०११/प्र.क्र.७/का.०२
नवीन प्रशासन भवन, ३रा मजला,
मादम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ जुलै, २०११.

५८७२०

पहा :- १) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र.मबाविआ/नोकमव/नवियो कमिटया/८८४३/१०-११, दि. १९/२१.१.२०११ व पत्र क्र. ९४२२, दि. ७/११.२.२०११.

**प्रस्तावना** :- केंद्र शासनाची नोकरी करणा-या महिलांसाठी वसतिगृह (working Women Hostel) ही सुधारित योजना कार्यान्वित झाली आहे. सदर योजनेबाबतच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाच्या वेबसाईटवर www.wcd.nic.in वर उपलब्ध आहेत. नोकरी करणा-या महिलांना वसतिगृहात प्रवेशासाठी मेट्रोपॉलिटन शहरासाठी मासिक एकूण उत्पन्न मर्यादा रु. ३०,०००/- व इतर शहरासाठी रु. २५०००/- राहील. नोकरी मिळविण्यासाठी प्रशिक्षण घेणा-या महिलांनाही वसतिगृहात प्रवेश देण्यात येणार आहे. प्रशिक्षण घेत असलेल्या महिलांची संख्या ही वसतिगृहाच्या क्षमतेच्या ३० टक्केपेक्षा अधिक नसावी. ३ वर्षापर्यंत अशा वसतिगृहात नोकरी करणा-या महिलांना राहता येईल. अपवादात्मक परिस्थितीत जिल्हा महिला कल्याण समितीच्या परवानगीने ६ महिन्यांनी एका वेळेस निवासाचा कालावधी वाढविता येईल, परंतू राहण्याचा कालावधी ५ वर्षापेक्षा अधिक असणार नाही. तसेच नोकरीसाठी प्रशिक्षण घेणा-या महिलेस फक्त १ वर्षासाठीच वसतिगृहात राहता येणार आहे. नोकरी करणा-या महिलेसमवेत १८ वर्षापर्यंतची मुलगी व ५ वर्षापर्यंतचा मूलगा राहू शकेल. नोकरी करणा-या महिलांच्या वसतिगृहात डे-केअर सेंटरची सुविधा करुन देणे बंधनकारक आहे. वसतिगृहात प्रवेश दिलेल्या नोकरी करणा-या व नोकरीसाठी प्रशिक्षण घेणा-या महिलेकडून सिंगल बेड रुमसाठी एकूण मासिक पगाराच्या १५ टक्के, डबल बेडरुमसाठी १० टक्के, व डॉरमेट्रीसाठी ७.५ टक्केपेक्षा जास्त भाडे आकारता येणार नाही.

या योजनेअंतर्गत कोणत्याही संस्था /संघटना जसे, महिला विकास महामंडळ, कॅन्टॉनमेंट बोर्ड, महानगरपालिका, पंचायत राज संस्था, स्वयंसेवी महिला बचत गट, महाविद्यालये/ विद्यापीठ, तसेच योजनेअंतर्गत अटी व शर्ती पूर्ण करणा-या भारतीय संस्था नोंदणीकृत कायदा १८६० व सार्वजनिक धर्मादाय संस्थे अंतर्गत नोंदणीकृत संस्था, सहकारी संस्था या योजनेअंतर्गत वस्तीगृह चालविण्यासाठी पात्र आहेत व त्यांना केंद्र शासनाचे सहाय्य मिळवू शकते. सुधारित योजनेत अशा संस्थांना फक्त सार्वजनिक जागेवर (only on public land) वसतिगृहाच्या बांधकामासाठी ७५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे. याशिवाय सुधारित योजनेत स्वयंसेवी संस्था भाडयाच्या इमारतीतही वस्तीगृह सुरु करु शकतात. भाडयाच्या इमारतीत वसतिगृहासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग /जिल्हाधिकारी यांनी प्रमाणित केलेले भाडेनुसार

५४१६/१२८३/११



जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे - १.
सर्वसाधारण शाखा
५४१६
दिनांक 21 JUL 2011
प्रमुख लिपिक

अनुदान या योजनेअंतर्गत अनुज्ञेय आहे. भाडयाच्या वसतीगृहास फक्त एकाच वेळेस प्रति लाभार्थी अनावर्ती खर्चासाठी रु. ७,५००/- अनुज्ञेय आहे. ५ वर्षावरील वसतिगृहासाठी रु. ५.०० लाख दूरुस्ती देखभालसाठी अनुदानाची तरतूद नव्याने करण्यात आली आहे. केंद्रशासनाकडून बांधकामासाठी तीन हप्त्यात ५० :४०:१० या प्रमाणात अनुदान देण्याची तरतूद आहे.

इच्छुक संस्थांनी सदर योजनेअंतर्गत प्रस्ताव विहित मार्गाने संबंधीत जिल्ह्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत सादर करणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या प्रस्तावांची छाननी करण्याकरीता तसेच योजनेच्या संनियंत्रणासाठी प्रधान सचिव, महिला व बाल विकास यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरावर स्टेट लेवल एंम्पॉवरिंग कमिटी स्थापन करण्याची तरतूद आहे. तर जिल्हा स्तरावर या योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी तसेच योजनेच्या संनियंत्रणासाठी डीस्ट्रीक्ट वुमन वेल्फेअर कमिटी जिल्हाधिकारी / जिल्हा दंडाधिकारी /नगरपालिका आयुक्त यांच्या स्तरावर ५ सदस्य असलेली समिती स्थापन करण्याच्या केंद्रशासनाच्या सूचना आहेत.

**शासन निर्णय :-** केंद्र शासनाच्या नोकरी करणा-या महिलांसाठी वसतिगृह (Scheme of Working Women Hostel) सुधारित योजनेतील तरतूदीप्रमाणे राज्यात जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे रचना केलेल्या डिस्ट्रीक्ट वुमेन्स वेल्फेअर कमीटया (DWWC) गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| (१) जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| (२) पोलीस अधिक्षक | सदस्य |
| (३) सार्वजनिक बांधकाम विभागाचा अभियंता | सदस्य |
| (४) जिल्हा कायदेविषयक सेवा प्राधिकरणाचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| (५) स्वयंसेवी संस्थेचा एक प्रतिनिधी (अशा स्वयंसेवी संस्थेचा कि जी स्वयंसेवी संस्था या योजनेअंतर्गत वसतिगृह चालवित नाही किंवा तसे तिने प्रस्तावीत केलेले नाही.) | सदस्य |
| (६) जिल्हाधिकारी यांना योग्य वाटेल अशी जिल्हयातील एखादी नामांकीत व्यक्ती. | सदस्य |
| (७) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | सदस्य सचिव |

(या समितीमध्ये कमीत कमी दोन महिला प्रतिनिधी असाव्यात )

**समितीचे अधिकार, कर्तव्ये व जबाबदा-या :-**

सदर समितीने खालील मुद्यांवर संनियंत्रण ठेवावे.

१) नवीन प्रस्ताव संकलीत करावे व छाननी करुन शिफारशीसह शासनाकडे पाठवावे. असे करताना उपयुक्त ठिकाणी जागा आहे काय (लोकेशन) याबद्दल खात्री करावी, शक्यतो दुर्गम क्षेत्रात, ग्रामिण क्षेत्रात वसतीगृह प्रस्तावित करु नये. शहरी क्षेत्रात जेथे अधिक काम करणा-या महिला असतात, तसेच बस स्थानक, रेल्वे स्थानकापासून जवळ किंवा केंद्रिय ठिकाणी ( Centrally located) वसतीगृह प्रस्तावित करावे. कारण यापूर्वी ग्रामिण/दुर्गम क्षेत्रात वसतीगृह उभारण्यात आलेले आहे व त्याचा योग्य वापर होत नाही असे लक्षात आलेले आहे.

२) भविष्यात फक्त शासकीय जमिनीवर बांधकाम करण्याची तरतूद आहे. म्हणजे स्वयंसेवी संस्था स्वतःच्या मालकीच्या जमिनीवर बांधकाम करु शकणार नाही. याचा मुख्य हेतू असा आहे की, यापूर्वी काही स्वयंसेवी संस्थांनी स्वतःच्या जमिनीवर अर्धवट बांधकाम केले किंवा वसतीगृहाचा उपयुक्त वापर केला नसल्यास, सदर इमारतीचा ताबा घेण्यास शासनाला अडचणी निर्माण झाल्या. कारण जरी इमारत शासनाच्या अर्थ सहाय्याने उभारली असली तरी जमिनीची मालकी स्वयंसेवी

संस्थेची होती. भविष्यात प्रस्ताव तयार करताना शासकीय संस्था, शासकीय महाविद्यालय, शासकीय रुग्णालय, विद्यापीठ किंवा इतर शासकीय कार्यालयीन आवार (Compound) तसेच शासनाची मोकळी जमिन जी मध्यवर्ती ठिकाणी असेल, फक्त अशा ठिकाणी वसतीगृहाचे बांधकाम प्रस्तावित करावे. यासाठी स्वयंसेवी संस्थेला संबंधित शासकीय विभागाची संमती घेणे किंवा जमिनीचे वाटप आदेश प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

३) हया योजनेला जास्तीत जास्त प्रसिध्दी द्यावी (उदा.प्रेसनोट देणे, प्रेस कॉन्फरन्स मध्ये माहिती देणे इ.) तसेच वेबसाईटवरही सदर महिती ठेवावी व स्वयंसेवी संस्था व इतर संस्थांकडून अर्ज मागविण्यात यावे. अर्जाचा नमूना वेबसाईटवर ठेवावा. ज्या शहरी क्षेत्रात सहजपणे केंद्रिय ठिकाणी शासकीय जमिन उपलब्ध होत नाही अशा ठिकाणी भाडयाच्या इमारतीत (उदा.फ्लॅटमध्ये, हौसिंग सोसायटीमध्ये इ.) वसतीगृह सुरु करण्यासाठी प्रोत्साहित करावे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत त्यांचे भाडे ठरवून घ्यावे.

४) यापूर्वी जे वसतीगृह मंजूर करण्यात आले आहे त्यांच्याबद्दलही काही तक्रारी प्राप्त होतात. केंद्र शासनाने अशी माहिती दिली आहे की, काही वसतीगृहात क्षमतेपक्षा फार कमी महिला राहतात किंवा नोकरी करणा-या महिला ऐवजी शिक्षण घेणा-या मुलींना वसतीगृहात प्रवेश देण्यात येतो. तसेच काही स्वयंसेवी संस्था केंद्र शासनाचा निधी प्राप्त झाल्यानंतर अर्धवट बांधकाम करतात, वसतीगृहाचे बांधकाम पूर्ण करत नाही व यामुळे शासनाचा खर्च वाया जातो अशा सर्व प्रकरणात सदर समितीने चौकशी करावी. स्वयंसेवी संस्थांना कारणे दाखवा नोटीस द्यावी, समाधानकारक स्पष्टीकरण प्राप्त झाले नाही तर सदर इमारत शासनाच्या ताब्यात घेण्याचे अधिकार या समितीला देण्यात येत आहे. सदर इमारत इतर उपयुक्त शासकीय कामासाठी (इतर कार्यालय सुरु करणे इ.) वापरण्याचे सदर समितीला अधिकार राहतील. तसेच स्वयंसेवी संस्थांकडून व्याजासह उपयुक्त दंड वसूल करण्याचे अधिकार या समितीस राहील. स्वयंसेवी संस्था दंडाची रक्कम भरत नसल्यास सदर रक्कम (arrears of land revenue) म्हणून वसूल करण्याचे अधिकार समितीला राहतील.

५) अस्तित्वात असलेल्या वसतीगृहाचे व्यवस्थापनावर संनियंत्रण ठेवण्याचे अधिकार या समितीला आहे. महिलांकडून विहित मर्यादेबाहेर शुल्क आकारला जात नाही याची खात्री त्यांनी करावी. काही संस्था extra Charges (अतिरिक्त शुल्क) आकारतात, देखभालीसाठी खर्च, विद्युत बिल, आहार, मेस चार्जेस, इतर शुल्क (उदा. साफसफाई, चौकीदार) हे सर्व शुल्क धरुन केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे शुल्क आकारण्याची खात्री करावी.

६) स्वयंसेवी संस्था कमी उत्पन्न असणा-या महिलांचे कोणत्याही त-हेने शोषण तर करत नाही याची खात्री करावी. विशेषतः पिडीत (destitute) महिलांचे लैंगिक शोषण तर होत नाही याची खात्री करावी.

७) शासनाच्या अनुदानाचा योग्य वापर होतो का हे तपासावे. ना नफा ना तोटा तत्वावर वसतीगृह चालविणे अपेक्षित आहे.

८) डे केअर सेंटर, शुल्क दर्शविणारा बोर्ड, इतर अटी व शर्तीबाबतची माहिती दर्शविणारे बोर्ड लावला आहे काय याची खात्री करावी.

९) जिल्हाधिका-यांनी त्यांचा जिल्हयातील सर्व वसतीगृहांचे वर्षात किमान एकदा बैठक बोलवावी व त्यांच्या सर्व प्रश्नावर विचार करावा जेणेकरुन भविष्यात चांगल्यापध्दतीने सदर योजनेची अंमलबजावणी सुरु राहील. नवीन सुधारीत योजनेला प्रसिध्दी देण्यासाठी एका महिन्याचा आत स्वयंसेवी संस्था, महाविद्यालय / विद्यापीठ, contonement बोर्ड इ.ची सभा घ्यावी व त्यांना वसतीगृहांचा प्रस्ताव तयार करण्यासाठी उद्युक्त करावे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलबध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०११०७१३१५३८३१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(जयंत जनबंधू)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मुख्यसचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
मा. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे.
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त.
आयुक्त, महानगरपालिका /नगरपलिका (सर्व) (जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे मार्फत)
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व) (महिला व बाल विकास अधिकारी यांचे मार्फत)
पोलिस अधिक्षक (सर्व) (जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे मार्फत)
अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (सर्व) (जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे मार्फत)
उप आयुक्त (महिला विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
जिल्हा कायदेविषयक सेवा प्राधिकरणाचे प्रतिनिधी (जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे मार्फत)
समिती सदस्य, स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी (सर्व) (जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे मार्फत)
जिल्हयातील नामांकीत नियुक्त सदस्य (जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे मार्फत)
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व),
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
उप सचिव /अवर सचिव/ कक्ष अधिकारी (सर्व), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (का-२)

***